ऊती संवर्धन प्रकल्प
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
परभणी - ४३१ ४०२

जा. क्र. टिसीपी/१७७/२०२२
दिनांक: ०७/१०/२०२२

## जाहीर संक्षिप्त ई-निविदा सुचना (दुसरी वेळ)

ऊती संवर्धन प्रकल्प, परभणी येथील प्रयोगशाळेत विविध ऊती संवर्धनाशी निगडीत कामे तसेच पॉलिहाऊस व शेडनेटमधील विविध कामे व कार्यालयीन दैनंदिन कामे करण्यात येतात. प्रयोगशाळेतील विविध कामे जसे कल्चर मेडिया तयार करणे, तो बाटलीमध्ये ठराविक प्रमाणात भरने, विविध काच पात्रे व कल्चर मेडिया आटोक्लेव्हद्वारे निर्जंतुक करणे, ऊती संवर्धित कामाकरिता वापरलेल्या कल्चर मेडिया व काच पत्रे साफ करणे, प्रयोगशाळा दररोज स्वच्छता करणे इ. कामे करणे. पॉलिहाऊस व शेडनेटमधील विविध कामे जसे लहान व मोठ्या पिशव्यांमध्ये वाळू व चाळलेली माती, शेणखत वाळू यांचे मिश्रण भरणे, सदरील पिशव्यांमध्ये ऊती संवर्धित रोपांची लागवड करून प्राथमिक व दुय्यम हार्डनिंग करिता व्यवस्थित ठेवणे, रोपांच्या प्राथमिक व दुय्यम हार्डनिंग करिता आवश्यक तापमान व सापेक्ष आर्द्रता राखून रोपांची निगा व देखभाल करणे, रोपांवर औषधे फवारणी व आळवणी करणे, तयार झालेली रोपे विक्री करते वेळेस वाहनात भरने इ. कामे करणे. तसेच मालमत्तेची सुरक्षा व ऊती संवर्धित रोपांची दिवस व रात्र देखरेख व देखभाल करणे. प्रयोगशाळेतील विजेवर चालणारे यंत्रे/ उपकरणे तसेच वातानुकुलीत सयंत्रे, ईनकुबेशन रूम मधील आवश्यक तापमान व प्रकाशमान यांचे नियंत्रण, देखरेख व निगराणी करणे व इतर दैनंदिन कामे करणे. उक्त नमुद केलेले विविध कामे कंत्राटी पद्धतीने करुन घेण्यासाठी ई-निविदा सुचना २०२२-२३ (कालावधी १० महिने) https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्याचे अवलोकन करुन ई-निविदा सुचनेतील तपशिल प्रमाणे ईच्छुक नोंदणीकृत संस्था / गुत्तेदार यांचाकडुन 'अ' आणि 'ब' दोन लिफाफा पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा फार्म व निविदेच्या सविस्तर नियम व अटी उपरोक्त संकेतस्थळावर दिनांक ११/१०/२०२२ पासून पाहता येतील. त्याचे अवलोकन करुन उचित कार्यवाही करावी.

सदस्य सचिव ई-निविदा समिती
तथा वरिष्ठ संशोधन सहाय्यक
ऊती संवर्धन प्रकल्प
वनामकृवि, परभणी